महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती – ४४४६०२

Maharashtra State Board Of Secondary & Higher Secondary Education, Amravati Divisional Board , –444602

मालटेकडी रोड, टोपे नगर अमरावती- ४४४६०२, महाराष्ट्र
Website : www.sscboardamrawati.in Telephone : 0721-2662647, 2662657 Email : divsecamt@rediffmail.com

क्र./अविमं/लेखा/2389
अमरावती—४४४ ६०२
दिनांक — ०२/११/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम.

विषय:— फेब्रुवारी—मार्च २०२७ च्या परीक्षा आवेदनपत्रामध्ये दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क सवलतीसाठी उपलब्ध केलेल्या नवीन टॅबबाबतच्या मार्गदर्शक सुचना.

संदर्भ:— राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./गणकयंत्र/१५७/४६६७, दि.३०/१०/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आगामी फेब्रुवारी—मार्च २०२७ च्या इ.१०वी व इ.१२वी परीक्षांचे नियमित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र भरण्याचे काम सध्या सुरू आहे. शासनाने राज्यातील दुष्काळ जाहीर केलेल्या भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद करण्यासाठी परीक्षा आवेदनपत्र भरण्याच्या ऑनलाईन प्रणालीवर एक नवीन टॅब उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सदर नवीन टॅबचा वापर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी कसा करावा, याबाबतची सविस्तर कार्यपध्दती स्पष्ट करणाऱ्या मार्गदर्शक सूचना (User Guidelines) या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

तरी सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी सदर मार्गदर्शक सूचनांनुसार दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद विहित मुदतीत पुर्ण करून घेण्यात यावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सोबत :— मार्गदर्शक सूचना (User Guidelines)

S. Salunke 03/11/2026
(संगिता साळुंके)
विभागीय सहा.सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

प्रत माहितीस्तव सविनय सादर—
मा. सचिव राज्यमंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव तथा पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव—
१. मा.शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.) अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम.
३. विभागप्रमुख माध्य. व उच्च माध्य., अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.


# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची कार्यपध्दती

माध्य/उच्च माध्य परीक्षेसंदर्भात मंडळाच्या आवेदनपत्र भरण्याच्या पोर्टलवर शाळा/क.महाविद्यालयांच्या लॉगीन मध्ये दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. ही सुविधा वापरण्यापुर्वी विद्यार्थ्याचे आवेदनपत्र पोर्टलवर भरलेले असणे आवश्यक आहे.


शाळा/क.महाविद्यालयांनी लॉगीन केल्यानंतर खालिल प्रमाणे कार्यवाही करावी.

१) लॉगीन केल्यावर Application menu खालिल Manage Dushkalgrast या सब-मेनुवर क्लिक करा

२) खालील इमेज मधील New Application मधील या बटनवर क्लिक करा.





३) दिलेल्या ड्रॉपडाऊन मधील Serial Number हे ऑप्शन निवडा





४) दिलेल्या टेक्स्टबॉक्समध्ये ४ अंकी आवेदन पत्र क्रमांक टाका.

५) विद्यार्थ्याच्या नावाची खात्री करुन पालकांच्या/विद्यार्थ्यांच्या बँक खात्याला संलग्न असलेला आधार क्रमांक टाका. (आधार क्रमांक अचुक तसेच बँक खात्यासोबत लिंक असणे आवश्यक आहे)


६) पात्रतेबाबत दिलेल्या निकषांची खात्री करुन योग्य ते चेकबॉक्स सेलेक्ट करुन Save बटन दाबुन दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र सेव्ह करा.




७) अशा पध्दतीने सेव्ह केलेले आवेदनपत्र मंडळास पाठविण्यासाठी Manage Dushkalgrast या सब-मेनुवर क्लिक करुन Dushkalgrasta/ दुष्काळग्रस्त & SEND TO BOARD या बटनवर क्लिक करा.




८) आपण आवेदनपत्र भरलेले तसेच दुष्काळग्रस्त म्हणुन नोंदविलेले विद्यार्थ्यांचे Application Sr.No. सिलेक्ट करुन Send to Division Board बटन दाबा.




अत्यंत महत्वाचे : दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र "Manage Dushkalgrasta" या मेनुमधुन नोंदविल्या नंतर "Send to Board" करणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने नोंदविलेले आवेदनपत्रांचे अनुक्रमांक पेमेंट करण्यासाठी उपलब्ध होणार नाही याची शाळा/क.महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.